# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ११/०२/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ११/०२/२००४ रोजी सभा सुचना क्र. ३३ दि. ०५/०२/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सायं. ०४.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ५) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ८) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १०) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १२) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १३) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| १४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २२८ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

सर्व सन्मा. सदस्य ह्यांनी ह्या ठिकाणी ज्या सुचना केलेल्या आहेत त्या सर्व सुचनांच्या दुरूस्तीसह आजची ही सभा.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यात आपल्याला जे नविन लोड करायचे आहे ते व आर्थिक जमा आणि खर्चाच्या बाबींच्या तरतुदीच्या रक्कमा यांच्या उल्लेखांसह.

**आसिफ शेख :-**

सर्व सुचना आणि ज्या तरतुदी केल्या आहेत, जमा आणि खर्च रक्कमेच्या दुरूस्तीसह आजची ही सभा मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००३-०४ सुधारित व सन २००४-०५ चे मुळ अंदाजपत्रक मा. महासभेपुढे शिफारस करत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

ठरावाला मंजुरी देण्यापुर्वी, मा. सभापती साहेब व सन्मा. सदस्य वित्तीय वर्ष २००३-०४ चे सुधारित अंदाजपत्रक व वर्ष २००४-०५ चे मुळ अंदाजपत्रक ह्या ठिकाणी आपण ठेवलेले आहे आणि याकरिता मिरा भाईंदरचा विकास होण्याच्या दृष्टीकोनातून सन्मा. सदस्य आणि प्रशासन ह्यांनी ह्या ठिकाणी आपल्याला सतत तीन दिवस या मुळ अंदाजपत्रकावर चर्चा केली व खातेनिहाय चर्चा करून प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या पद्धतीच्या मागणीनुसार ती मागणी पुर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून सर्व सन्मा. सदस्यांनी जी जी माहिति खात्याकडून मिळेल त्या माहितीचा आधार आणि वस्तुस्थितीच्या आधारावर त्यांची मागणी पुर्ण करण्यासाठी दिलेली आहे. त्याचप्रमाणे भांडवली खर्चामध्ये कुठे ही काटशहा न करता, भांडवली खर्च तसाच ठेवून कोणतीही कर वाढ न सुचविता ह्याठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांनी प्रशासनाच्या सहकार्याने, प्रशासनाने दिलेल्या सुचनेप्रमाणे त्या सुचनांवर हा अंदाजपत्रक आपण ह्याठिकाणी मंजुर करत आहोत आणि महिला बालकल्याण समितीसाठी आणि दुर्बल घटकांसाठी एकूण बजेटच्या पाच टक्के, महसुली उत्पन्नावर पाच टक्के अशापद्धतीचा जो खर्च येईल तो खर्च आपण संबंधित समितीसाठी ठेवणार आहोत आणि एकूण १५७ कोटी रूपये आणि कर्ज ३१ कोटी रूपये असे मिळून १८८ ते जवळ जवळ १९० कोटी रूपयापर्यंतचे अंदाजपत्रक ह्या ठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांनी आणि प्रशासनाने मंजूर केलेला आहे आणि त्ते करण्यासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न केले व अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये कोणताही पक्ष घटक तट न बघता हा मिरा भाईंदर शहराचा विकास आहे आणि ह्या विकासाकरिता त्यांनी आपले योगदान या ठिकाणी दिलेले आहे. त्याबद्दल मी सर्व पक्षाचे जे घटक पक्ष ह्या ठिकाणी आहे त्यांना धन्यवाद देतो आणि सदस्यांना ही धन्यवाद देतो आणि अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आपण हा अंदाजपत्रक एकूण १८८ ते १९० कोटीच्या घरामध्ये आपण पोहोचवलेले आहे. सन्मा. सभापती साहेबांनी सर्व सदस्यांना ज्या पद्धतीने खेळीमेळीच्या वातावरणामध्ये एकत्र घेउन आपल्या कुटूंबाप्रमाणे सर्वांना एकत्र घेउन या शहराच्या विकासासाठी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये काम करू शकतो याची प्रचिती सन्मा. सभापती मॉरस रॉड्रीक्सजी ह्यांनी ह्या ठिकाणी दुसरा अर्थसंकल्प सादर करताना आपल्याला दिली, त्याबद्दल सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने आम्ही आपले येथे हार्दीक अभिनंदन करतो आणि प्रशासनाला ही हार्दिक अभिनंदन देउन हा जो ठराव सन्मा. सदस्य आसिफ शेख ह्यांनी मांडला आहे त्या ठरावाला मी माझे पुर्णपणे समर्थन देत आहे. धन्यवाद.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख ह्यांनी मांडलेल्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

सन्मा. सभापती साहेब, उपस्थित सर्व स्थायी समिती सदस्य आणि सर्व उपस्ीित अधिकारी. गेले तीन दिवस आपण सातत्याने ह्या अंदाजपत्रकावर गंभीरपणे चर्चा करून अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आपण हा अंदाजपत्रक स्थायी समितीने मंजुर केला व त्यामध्ये अनेक सुधारणा केल्या आणि शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत चांगला अंदाजपत्रक स्थायी समिती आपण शिफारस करत आहात असे प्रशासनाचे मत झाले आणि प्रशासनाच्या वतीने मी आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो. धन्यवाद. जय हिंद.

**प्रकरण क्र. २२८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००३-०४ सुधारित व सन २००४-०५ चे मूळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समिती सभेची शिफारस करणेबाबत.

**ठराव क्र. २०८ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २००३/२००४ चे सुधारीत व सन २००४/२००५ चे मूळ अंदाजपत्रकास कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल तसेच प्रत्येक विभागांची विभागप्रमुखांकडून तपशिलवार माहिती प्राप्त करुन घेवून मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली अपेक्षित वाढ घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला लेखाशिर्ष निहाय खर्च विचारात घेवून २००४/२००५ या वित्तीय वर्षात रक्कम रुपये ५,०१ लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास

आजची सभा एकमताने मंजुरी देत आहे. अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | २००३/०४ | २००४/०५ |
|---|---|---|
| अंदाजपत्रक ''अ'' ''ब'' ''क'' एकूण जमा | १६१६०.९० | १८२७६.९२ |
| अंदाजपत्रक ''अ'' ''ब'' ''क'' एकूण खर्च | १५८०९.४२ | १८२७१.९१ |
| अखेरची शिल्लक | ३५१.४८ | ५.०१ |

**सुचक :- श्री. आसिफ शेख. अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

ठरावाचे पुर्नवाचन करून ठराव कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २२८ :-**

जकात दरामध्ये वाढ करणेंस मंजुरी मिळणे.

**ठराव क्र. २०९ :-**

मिरा भाईंदर महापालिकेने नगरपालिकेची अस्तित्वात असलेली जकात दर सुची लागु केली आहे. त्यानुसार जकात वसुल केली जात आहे. महापालिकेच्या आजुबाजुच्या उदा. ठाणे, कल्याण, डोंबिवली, मुंबई या महापालिकेचे जकातीचे दर आपल्या जकातीच्या दरापेक्षा बहुतांशी ॲटम वर जकात दर जादा आहेत. जकात दर सुची मधिल काही ॲटमवर उत्पादन करणारी मुळ कंपनी जकातीचा भार सोसुन एम.आर.पि. नुसार मालाची विक्री होत असते. अशा उत्पादन करणाऱ्या कंपन्या जकातीचा भार पुर्णतया सोसत आहेत. त्याचा बोजा ग्राहकांवर पडत नाही. महापालिकेचे उत्पन्नाचे मार्ग मर्यादीत आहेत. शहराची विकासकामे करणे, नागरीकांना नागरी सुविधा देणे हे महापालिकेचे कर्तव्य असले तरी देखील महापालिकेचे मर्यादीत उत्पन्नामध्ये आर्थिक दृष्ट्या अडचणीचे होत आहे. यासाठी महापालिकेचे उत्पन्न वाढविणे जरुरीचे आहे.

जकात दरसुचिमधील खालील नमुद केलेल्या ॲटमवर जकात दर वाढविल्यास महापालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल.

| ॲ. क्र. | मालाचे वर्णन | सध्याचा दर | प्रस्तावित वाढीव दर |
|---|---|---|---|
| | | किंमतीवर | किंमतीवर |
| | | दर शेकडा | दर शेकडा |
| १३. | डबा बंद मासळी, खवा मिठाई, मुरंबा व जेली, गोठवलेली परिरक्षित दुध, आईस्क्रीम, सर्वप्रकारचे फरिनशियन अन्न, लोणची, कोको, कोकोचे बी व चॉकलेट्स, बिस्किटे व केक, डुकराची पातळ चरबी (लॉर्ड) किंवा प्राण्यांची खाद्य चरबी, मावा दुधाची मलई, चका व दही, फळांचे रस, सरबते व सर्व पेये ग्लुकोज, डेक्स्ट्रोज किंवा कोणत्याही फळाची साखर, (खाद्यतेलांव्यतिरिक्त) तेलाच्या दुकानातील माल, परिक्षित किराणा माल बेकींग किंवा करी पावडर, सकरीन, सर्व प्रकारचे खद्य व रंग व अर्क, इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज, सातुचे वाळलेले सत्व (माल्ट एक्ट्रॉक्स्ट्रॅट) मध, पापड, बटाट्याचे वेफर, कोणत्याही वापरासाठी जतन केलेले मांस | २.०० | ३.०० |

| अ. क्र. | मालाचे वर्णन | सध्याचा दर किंमतीवर दर शेकडा | प्रस्तावित वाढीव दर किंमतीवर दर शेकडा |
|---|---|---|---|
| | आणि होलमिल्क किंवा टोन्ड मिल्क किंवा स्किम मिल्क पावडर किंवा नीरा यांच्याव्यतिरिक्त विशेषरित्या तरतुद न करण्यात आलेले सर्व प्रकारचे अन्न किंवा पेय. | | |
| १९. | सर्व प्रकारची भारतीय मिठाई, ब्रेड बरी, चिवडा. | प्रति १० किलोला १.०० | प्रति १० किलोला २.०० |
| ३१. | फटाके, दारुकाम व त्याचे घटक भाग, कॅल्शीयम, कारबाईड व रक्षणवर्ति (सेप्टोफ्युज) | ३.०० | ४.०० |
| ३२. | दीपमाला, ग्लोब, चिमण्या, विजेचे बल्ब व विजेच्या किंवा गॅसच्या प्रकाशासाठी असलेल्या वस्तू. | २.०० | ३.०० |
| ३४. | पोट्याश, रिठा, सोडा, तुरटी, लबण पदार्थ, शिकेकाई, धुण्याचा सोडा, परिष्कृत सोरा मीठ, फिनेल व कपडे, फरशी भांडी धुताना वापरण्यात येणारे इतर पदार्थ. | १.०० | २.०० |
| ३८. | (ब) अशुद्ध तेल (क्रुड ऑईल) | ०.६० | १.०० |
| ४४. | सर्व प्रकारचे सिमेंट. | २.५० | ४.०० |
| ४५. | कोळशाचे डांबर (कोलटार, असफाल्ट, बिट्युमेन, फरसबंदी, दगड, मॅगनीझ, इमरी दगड किंवा चुरा, चुन्याची धकी (चॉक्सपावडर), दगडाच्या चिपा (स्टोन चिप्स) दगडाची पूड, आग्रा दगड, इमारतीचे दगड, खंगर (क्लिंकर) व कोळशाची राख. | ३.०० | ४.०० |
| ४६. | चकाकी दिलेल्या विटा व फरशा, संगमरवरी दगड, भट्टीच्या विटा, विटा व सर्व प्रकारची छप्परी कौले, फ्लोअरींग टाईल्स, फरशीच्या लाद्या, इत्यादी. चायना मोझाईक चिप्स, मोझाईकचा संगमरवरी दगड, मोझाईक किंवा टेरॅझोची कौले, मातीचे नळ, सिमेंटचे नळ आणि ॲसवेस्टॉस सिमेंट पत्रे, | ३.०० | ४.०० |
| ५३. | (अ) केसांचे तेल, सुगंधी तेले, सर्व प्रकारची सुगंधी द्रव्ये, सेंटस्, अत्तर, सुगंधित वस्तु, उदबत्त्या, सुगंधित रसायने, सर्व प्रकारची सौंदर्य प्रसाधने, दाढीचे क्रीम, दाढीचे साबण, दंत मंजन, टुट पेस्ट, पोमेड, फण्या, ब्रश, आरसे, केसाच्या पिना, ब्रेसेस, गोटेर्स, सस्पेंडर्स.<br>(ब) कात्र्या, वस्तारे, सेफ्टी रेझर्स, ब्लेडस्, सुरे, चाकु, चमचे, काटे, कटलरी सर्व प्रकारची, सर्व प्रकारच्या सुऱ्या, कुलूप व किल्ल्या, स्टोव्ह व पेट्रोमॅक्स आणि त्यांचे भाग व उपसाधने आणि लोखंडी सामान. | २.००<br>२.०० | ३.००<br>३.०० |
| ५७. | सिगारेट्स व सिगर, सिगार व सिगारेट होल्डर्स, स्मोकिंग पाईप, सिगरेचा कागदर, पाईपचा, सिगारेटचा तंबाखु, तंबाखुच्या केसेस, पोचेस, सिगार व सिगारेट ठेवण्याच्या डब्या, हुक्का व धुम्रपानासाठी आवश्यक वस्तू व सिगारेट लायटर्स. | ३.०० | ४.०० |

वर नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावीत वाढीव दर लागू करणेंस मंजुरी देण्यांत येत आहे. या दरवाढीमुळे महापालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे. तरी सदरहु वाढीव दर दि. १८/५/२००४ पासुन लागु करण्यात यावे अशी महासभेच्या मंजुरीसाठी शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. याकुब इ. कुरेशी. अनुमोदन :- श्री. नितीन ठाकुर.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सांय. ४.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**